# योसेफ आणि इतरांना देवाची मुक्त करणारी कृपा मिळाली

मुलांचे शिक्षक: मुलांचा G3b हा अभ्यास वाचा.

**प्रार्थना:** "हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझ्या अपार कृपेच्या अखंड प्रवाहाला अडथळा ठरणाया लोकांचा व परंपरेंचा येशू, पेत्र व पौल ह्यांनी प्रतिकार केला; तसे दृढपणे उभे राहण्यास आमचे साहाय्य कर."

**1. आपल्या प्रभुची विनामूल्य कृपा मिळण्यासाठी देवाच्या वचनाने तुमच्या अंत:करणाची तयारी करा.**

| नव्या करारात सांगितले आहे | धार्मिक परंपरा सांगतात |
|---|---|
| कृपा मिळण्यास सर्वस्वी अमाप असणाऱ्या पण विश्वास ठेवणाऱ्या पातक्यांसाठी कृपा ही देवाच्या क्षमाशीलतेची व सार्वकालिक जीवनाची देणगी आहे. कृपेचा एकमेव स्रोत रोम 5:8-21 मध्ये पाहा. | "कृपा विनामूल्य मिळते तर आपल्याला काहीही मनमानी करता येईल आणि पाप करीत राहता येईल असा विचार ख्रिस्ती लोक करतील." हे खरे आहे का ते रोम 6:1-14 मध्ये पाहा. |
| देवाचा चांगुलपणा पातक्यांना पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त करतो, रोम 2:4. कृपा विश्वासणाऱ्यांना काय करण्यास भाग पाडते ते तीत 2:11-15 मध्ये पाहा. | "धार्मिक पुढाऱ्यांनी योग्य सुव्यवस्था राखण्यासाठी मंडळ्यांना कडक नियम लावून दिले पाहिजेत तसेच पवित्र शास्त्राबरोबरच मानव निर्मित धोरणांच्या द्वारे त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे." |
| विश्वासाच्या द्वारे कृपेने तारण होते. पाहा इफिस 2:8-10 मध्ये तारणातून सत्कृत्ये होतात की सत्कृत्यांतून आमचे तारण होते. | तारणासाठी सत्कृत्यांची आवश्यकता आहे. माझ्या यादीतील मनाई केलेली कोणतीही चैन केलीत तर तुमचे तारण होणार नाही. |

उत्पत्ती अध्याय 37 व 39-45 मधून योसेफाचा कथा वृत्तांत वाचा ख्रिस्ताच्या विरुद्ध पातक करणारे पश्चात्ताप करतात तेव्हा तो कोणतीही आडकाठी न ठेवता त्यांना क्षमा करतो याचे उदाहरण शोधा योसेफ आणि येशू यांच्यामध्ये बराच सारखेपणा होता:

त्याच्या पित्याची त्याच्यावर खूप प्रीती होती.

त्याच्या भावांनी त्याला नाकारून विकून टाकले.

त्याला अन्यायाने शिक्षा करण्यात आली.

त्याला अधिकार पदाची उच्च जागा बहाल करण्यात आली.

त्याला दुखावणाऱ्यांना त्याने क्षमा केली.

त्याने एका मेजवानीच्या प्रसंगी स्वत:ला प्रकट केले. (आपल्याला मोठ्या मेजवानीच्या प्रसंगी येशूचा चेहरा पहायला मिळणार आहे, प्रकटी 19:6-9 1 योहान 3:2).

त्याने त्यांना राहण्यास उत्तम जागा दिली.

**2. पुढील आठवड्यातील कार्यक्रमांची आखणी सहकाऱ्याशी चर्चा करून कार्यक्रमाचा आखणी करा.**

धार्मिक नियम बंधनांमध्ये अडकून पडलेले विश्वासणारे व पाळक ह्यांना भेटून कृपा काय आहे ते समजून सांगा.

3. **येणाऱ्या उपासनेच्या सभेविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करून योजना आखा.** (गरजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा)

योसेफाचा कथा वृत्तांत सांगून त्याचे जीवन येशूची कृपा अनेक मार्गांनी दाखविते हे स्पष्ट करून सांगा.

धार्मिक परंपराची बंधने तोडणारी 'सात स्वातंत्र्ये' स्पष्ट करून सांगा. मंडळीतील निकोप सामाजिक जीवनाचा आनंद लुटता यावा आणि ख्रिस्तासाठीची चळवळ सर्वदूर पसरली जावी यासाठी आपण ही स्वातंत्र्ये आचरणात आणणे अगत्याचे ठरेल.

- एका मोठ्या कागदाच्या पट्टीवर 'श्रीयुत परंपरावाले' असे लिहून ती भूमिका कोणाला तरी करण्यास सांगा.
- 'श्रीयुत परंपरावाले' मानव निर्मीत नियम बंधने लादतात असे स्पष्ट करा. अशी माणसे सर्वत्र असतात! तुम्ही प्रत्येक स्वातंत्र्य काय आहे ते वाचून दाखवल्यावर श्रीयुत परंपरावाले तुमच्याशी वादविवाद करतील. त्यांची चूक दुरूस्त करण्यास लोकांना सांगा.

1) **येशूने आज्ञापिलेल्या आणि त्याच्या शिष्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणलेल्या सर्व गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य त्याच्या आज्ञामध्ये विश्वासणाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या खात्रीचा समावेश आहे.** यात विश्वासणाऱ्यांना देवाची कृपा व क्षमा विनामूल्य मिळते त्यांना कोणत्याही मानव निर्मीत आवश्यकता शिवाय बाप्तिस्मा मिळतो आणि विश्वासणारे एकत्र जमलेले असतात. तिथे प्रभुभोजनाचा विधी साजरा करता येतो, ह्या गोष्टींचा समावेश आहे.

**श्रीयुत परंपरावाले** आपला फलक उंचावून वादास तयार होतात ते त्यांचे मत मांडतात, "बाप्तिस्मा देणे आणि प्रभुभोजनाचा विधी करणे हे काम फक्त दीक्षित पाळकांनीच करायचे असते. बाप्तिस्मा घेणाऱ्या उमेदवारांनी प्रथम ते पवित्र आहेत हे सिद्ध करण्यासाठी पाण्यावर चालणे आवश्यक आहे!"

विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरावाल्यांची चूक दुरूस्त करण्यास सांगा. मग मनुष्याची आज्ञा पाळण्यापूर्वी आपण येशूची आज्ञा पाळतो हे स्पष्ट करून सांगा.

- प्रे. कृ. 2:38-47 मध्ये यरूशलेमेतील आरंभीच्या विश्वासणाऱ्यांनी अगदी सुरुवातीपासूनच येशूची आज्ञा पाळली.
- प्रे. कृ. 2 मध्ये उल्लेख केलेल्या 3,000 नवीन विश्वासणाऱ्यांनी ज्या सात गोष्टी केल्या त्यातून येशूने सांगितलेल्या आज्ञांचा सारांश सांगता येतो.
- त्यांनी पश्चात्ताप करून पवित्र आत्मा मिळविला बाप्तिस्मा झाला, त्यांनी प्रभुभोजन घेतले एकमेकांवर प्रीती केली, हे त्यांच्या सहभागितेत पहायला मिळते त्यांनी प्रार्थना केली, दान दिले आणि लोकांना शिष्य केले.
- येशूने मत्तय 28:18-20 मध्ये काय सांगितले की त्यामुळे त्याच्या आज्ञा सर्व मानवी नियमांपेक्षा श्रेष्ठ ठरल्या.

2) **शोधकांच्या घरी जाणे, सुवार्ताप्रसार करणे व त्यांच्या घरांमध्ये नवीन मंडळ्या सुरू करून त्यांचे कुटुंबिय व संस्कृतीमध्ये राहून कार्य करण्याचे स्वातंत्र्य.**

- **श्रीयुत परंपरावाले** नापसंती व्यक्त करतात, "मित्रांच्या वाईट प्रभावापासून नवीन विश्वासणाऱ्यांना ताबडतोब वेगळे केले पाहिजे. आणखी दुसरी मंडळी सुरू करण्यापूर्वी आधीची मंडळी चांगली जुनी जाणती परिपक्व अशी असली पाहिजे. यासाठी आमच्या विभागिय कार्यालयाची मंजुरी घेतली पाहिजे तसेच नव्या पाळकांचा पगार देण्याइतके सभासद त्यामध्ये असले पाहिजेत."

- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरावाल्यांची चूक दुरूस्त करण्यास सांगा. आम्ही कुटुंबाच्या कार्यकक्षेत सेवा करणे अगत्याचे आहे हे स्पष्ट करून सांगा. येशू आणि शिष्य बहुतेक वेळा घरोघरी गेले. तेथे त्यांच्याबरोबर जेवले. देवाचा शोध करणाऱ्यांचे कुटुंबिय व मित्रमंडळी यांच्याशी त्यांनी तत्काळ संवाद साधला. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी नवीन मंडळ्या सुरू केल्या त्या मंडळ्यांकडे इमारती हव्यात किंवा पगारासाठी पैसा हवा अशी मागणी काही त्यांनी केली नाही.

**3 ) एकमेकांशी संवाद साधता येईल इतपत मर्यादित संख्या असलेल्या लहान लहान गटांमध्ये एकमेकांची सेवा कण्याचे स्वातंत्र्य ( 1 करिंथ 14:24-26 ).**

- श्रीयुत परंपरावाले आक्षेप नोंदवतात: "आम्ही सर्व गोष्टी सभ्यपणे आणि व्यवस्थितपणे केल्या पाहिजेत. आणि व्यवस्था मी सांगेन तीच असणार! सार्वजनिक सभांचे पुढारीपण केवळ सुशिक्षित पाळकांनीच करावे."
- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत पुढारीपण केवळ सुशिक्षित पाळकांनाच करावयास सांगा. देवाने आम्हांला विविध आध्यात्मिक कृपादाने दिलेली आहेत. त्यांचा उपयोग करून एकमेकांची सेवा करण्याची आज्ञा देवाने दिली आहे. आम्हांला बोलण्याचे आणि प्रत्येकाला एकमेकांशी बोलता येईल इतपत गटातील लोकांची संख्या मर्यादित ठेवण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

**4 ) देवाच्या अपेक्षा पूर्ण करणाऱ्यांची, पगारी किंवा मानद, पुढारी म्हणून नेमणूक करण्याचे स्वातंत्र्य**

- श्रीयुत परंपरावाले युक्तिवाद करतात: "आमच्या मंडळीचा पाळकवर्ग हा दीक्षितच असला पाहिजे. आमच्या नीतीधोरणांच्या पुस्तकातील 734 आवश्यक गोष्टी त्यांनी प्रथम करणे गरजेचे आहे. शिवाय त्यांच्याकडे व्यावसायिक शैक्षणिक गुणवत्ताही असलीच पाहिजे."
- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरावाल्यांची चूक दुरुस्त करण्यास सांगा. नव्या मंडळ्यांची देखरेख करण्यासाठी पौलाने वडीलजनांची नेमणूक करून त्यांना मार्गदर्शन केले, प्रे. कृ. 14:23 त्याने तीतालाही तसेच करण्यास सांगितले, तीत. 1:5-9.

**5 ) जुन्या मंडळ्यांच्या रीतींचे अनुकरण न करता वेगळ्या मार्गांनी काम करण्याचे स्वातंत्र्य.**

- श्रीयुत परंपरावाले असहमती दाखवितात: "मी मान्यता दिलेल्या त्याच सर्व पद्धती आम्ही वापरल्या पाहिजेत. ख्रिस्तामधील ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी आम्ही त्याच रीतींशी जुळवून घेतले पाहिजे. आम्ही सर्वांनी एकाच पद्धतीने वचनातून उपदेश केला पाहिजे. पुलपीटवर उभे राहायचे म्हणजे दर्जेदार उच्च गुणवत्ता आणि बुद्धीमत्ता या गोष्टी देवासाठी आवश्यक आहेत."
- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरवाल्यांची चूक दुरूस्त करण्यास सांगा. येशू आणि शिष्यांनी वापरल्या तशा अनेक पद्धती आम्हांलाही वापरता येतील. प्रत्येक गटाचा आकार, त्यांच्या पुढाऱ्यांची परिपक्वता आणि स्थानिक रीतींना साजेशी कोणतीही पद्धत वापरता येते, हे स्पष्ट करून सांगा.

**6 ) पाळक वर्गाला प्रशिक्षण देणाऱ्यांना त्यांच्या मंडळीच्या तातडीच्या गरजांना प्रतिसाद देण्याचे स्वातंत्र्य.**

- येशूने म्हटले, सूज्ञ शिक्षक जुन्या व नव्या गोष्टी सांगतात, मत्तय 13:52 आम्ही नव्या पुढाऱ्यांसमोर पर्याय ठेवले पाहिजेत म्हणजे त्याच्या नव्या मंडळीच्या सध्याच्या गरजांनुसार त्यांना योग्य अभ्यासक्रम निवडता येईल.
- श्रीयुत परंपरावाले जोरदारपणे प्रतिपादन करतात: "माझ्या प्रशिक्षण कार्यक्रमात एक प्रमाणभूत अभ्यासक्रम आहे. प्रत्येक विद्यार्थी एकाच गोष्टीचा अभ्यास करतो, एकाच वेळी सुरुवात करून एकाच मार्गाने वाटचाल करतात. पदवीधर होऊन दीक्षा मिळल्यावर ते सर्व या गोष्टी भविष्यात आचरणात आणतील"

- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरावाल्यांची चूक दुरूस्त करण्यास सांगा. मग तात्कालिक परिस्थिती आणि तत्काळ गरजांना प्रतिसाद देत ख्रिस्ताने शिक्षण दिले हे स्पष्ट करून सांगा. क्रेतामधील नवीन मंडळ्यांमधील उणीवा दूर करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यास पौलाने तीताला सांगितले होते. पुष्कळदा नव्या मंडळ्यांच्या गरजा निरनिराळ्या असतात.

**7) तीतासारखे समन्वयक विभागामध्ये नेमण्याचे स्वातंत्र्य हे समन्वयक नव्या मंडळ्यांवर देखरेख करून पाळक वर्गाला प्रशिक्षण देतील. पौलाने तीताला अशाच सूचना दिल्या होत्या. तीत 1: 5.**

- श्रीयुत परंपरावाले युक्तिवाद करतात: "नव्या मंडळ्यांनी स्वत:चा कारभार स्वत:च पाहावा त्यांच्यावर फक्त बिशपचे नियंत्रण असेल आणि ते दर पाच वर्षांनी त्यांना भेट देतील. नव्या मंडळ्यांवर कोणी देखरेख ठेवायचीच असेल तर ती मी ठेवीन."
- विश्वासणाऱ्यांना श्रीयुत परंपरावाल्यांची चूक दुरूस्त करण्यास सांगा. मग स्पष्ट करून सांगा की नवजात अर्भकांप्रमाणेच नव्या मंडळ्यांचा तातडीच्या गरजा असतात तसेच जुन्या जाणत्या मंडळ्या आणि पुढाऱ्यांच्या मदतीची आवश्यकता असते. प्रत्येक मंडळीतील उणीवा जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी वडीलजनांची नेमणूक करण्याकरिता पौलाने तीताला क्रेतमध्ये ठेवले.

मुलांना त्यांची उधळ्या पुत्राविषयीची नाटिका सादर करण्यास सांगा. त्यांना कविता सादर करता येईल तसेच प्रौढांना त्याविषयी प्रश्न विचारता येतील. सहाय्यकांना जक्कय लूक 19:1-10 आणि पापी स्त्री लूक 7:36-50 यापैकी एक अथवा दोन्ही वृत्तांत सांगण्यास किंवा त्यांचे नाट्यीकरण करण्यास सांगा. कथा वृत्तांत सांगून झाल्यावर यातून येशूची कृपा कशाप्रकारे पहायला मिळते ते लोकांना विचारा: देवाची क्षमा करणारी कृपा विश्वासणाऱ्यांपर्यंत कशी पोहंचली याविषयी त्यांना साक्ष देण्यास सांगा.

**पाठ करा योहान 1:14** येशू कशाने परिपूर्ण झाला हे लक्षात घ्या.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net